


# कलावंतांवर सेन्सॉरशिप असता कामा नये : संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल

◆ पुणे (प्रतिनिधी) :

कलावंतांवर सेन्सॉरशिप असता कामा नये. आमचे म्हणणे आम्हाला मांडू द्या, असे राज्यकर्त्यांना ठणकावून सांगितले पाहिजे, असे परखड मत संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांनी येथे व्यक्त केले.

दरम्यान, सत्ता बदलाचा पहिला अंक आम्ही दीड वर्षापूर्वीच घडवून आणला आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा दुसरा अंक सध्या सुरू आहे. लवकरच आमच्या विजयाचा तिसरा अंकही पार पडेल, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या मंचावरून शनिवारी राजकीय फटकेबाजी केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. स्वागताध्यक्ष शरद पवार, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, मावळते अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, मुख्य निमंत्रक उदय सामंत, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, उपाध्यक्ष व निमंत्रक भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, संमेलनाचा हा अतिशय दिमाखदार असा सोहळा आहे. १००व्या संमेलनाला मी उपस्थित रहावे, ही बहुदा नियतीचीच इच्छा असावी. मराठी रंगभूमीने आजवर अनेक स्थित्यंतरे पाहिली. मात्र, ती टिकून आहे. आज सोशल मीडियाच्या काळातही मराठी प्रेक्षक नाटकासाठी गर्दी करतात, ही आश्वासक बाब आहे. १०० वर्षांचा सुवर्णकाळ अनुभवताना अनेकदा काळोखही मराठी रंगभूमीने अनुभवला आहे. शेअर मार्केटप्रमाणे चढ उतारही पाहिले आहेत. खरे तर चढ-उतार हे गतिमानतेचे लक्षण होय. म्हणूनच वाईट काळातही रंगभूमी थांबली नाही. कलाकारांना टाळ्यांतून दाद मिळते, तर आम्हा राजकारण्यांना मतपेटीतून दाद मिळत असते.

संबंधित बातमी पान ३